# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/०८/२०२६ (शुक्रवार )**

.....................................................................................................

## अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## आरोपी अटक, अग्निशस्त्र, ४ काडतुस जप्त
## एमआयडीसी बोरी पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन एमआयडीसी :— **मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक, उमरेड उपविभाग (प्रभार नागपुर उपविभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी बोरी पोलीसांनी अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद करून आरोपीला अटक केले. अग्निशस्त्र, ४ काडतुस आणि दुचाकी वाहन जप्त केले आहे.**

दिनांक २७/०८/२०२६ रोजी एमआयडीसी बोरी पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, वाटेघाट येथील अभिषेक संजय चौधरी हा स्वत:जवळ अग्निशस्त्र बाळगुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या तयारीत आहे. नमुद माहीती प्राप्त होताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळ गाठले असता वॉटर टॅंक, वाटेघाट जवळ बुलेट क्रमांक एम एच ४० सी पी ७०८९ सह **अभिषेक संजय चौधरी, वय २० वर्षे, रा वार्ड क्र ०१ वटेघाट,ता हिंगणा जि नागपुर** याला ताब्यात घेतले. पोलीसांनी त्याला विश्वासात घेवुन त्याची चौकशी केली असता त्याने लपवुन ठेवलेले **देशी बनावटीचे माउजर आणि जिवंत काडतुसे** काढुन दिली. सदर अग्निशस्त्राच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे जवळ कोणताही परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी बनावटीचे माउजर किंमती ३५,०००/— रूपये, २) मॅगझीन किंमती १,०००/— रूपये, ३) ४ जिवंत काडतुसे किंमती ४,०००/— रूपये आणि ४) बुलेट क्रमांक एम एच ४० सी पी ७०८९ किंमती ७०,०००/— रूपये असा एकुण १,१०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.नमुद प्रकरणी आरोपींविरूध्द**

पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे कलम ३/२५ शस्त्र  अधिनियम सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे. साखळी पुरावे जोडुन पोलीस अधिक तपास करीत आहेत.



# खुनाच्या गुन्हयातील आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली सदोष मनुष्यवधाची शिक्षा

**पोलीस स्टेशन काटोल** :— पोलीस स्टेशन काटोल येथे अप. क्र. २८६/२०२१ कलम ३०२, ३०७,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक १७/०७/२०२१ रोजी मौजा एरंडा शिवार येथे यातील फिर्यादी नामे हर्षल अशोक गाढवे, वय १८ वर्ष, रा. पारडसिंगा काटोल,जि. नागपुर याचे वडील मृतक अशोक बापुराव गाढवे, वय ४० वर्षे यांच्यासोबत यातील आरोपी गोपाल मधुकर गाढवे, वय ३५ वर्ष, रा. पारडसिंगा काटोल, जि. नागपुर याने शेतजमीन व शेत धुऱ्याचे कारणावरून वाद करून मृतक यांना काठीने आणि कुऱ्हाडीने डोक्यावर मारहाण करून गंभीर जखमी करून त्यांचा खुन केला.

**तपासी अधिकारी श्री आकाश राठी, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन काटोल यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक २८/०८/२०२६ रोजी मा. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायधीश श्री पी. जे. मोडक यांनी नमुद आरोपी गोपाल मधुकरराव गाढवे यास भारतीय दंड संहितेच्या कलम ३०४ (भाग—२) अन्वये दोषी ठरवुन फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २३५ (२) अन्वये त्यास या प्रकरणात यापूर्वी भोगलेल्या कारावासाच्या कालावधी इतकीच (सन २०२१ पासुन आजपर्यंत) शिक्षा सुनावण्यात आली असून, ५०००/—रूपये दंडाची शिक्षा ,दंडाची रक्कम न भरल्यास त्यास सहा महिने साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती आशावरी परसोडकर यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री रणजित शिरसाठ, प्रभारी अधिकारी,पोलीस स्टेशन काटोल, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सहा. पोलीस निरीक्षक श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री मनोज तिवारी, ब.नं १६४१, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी पोहवा बाबा नेवारे ब. नं ८२ पोलीस स्टेशन काटोल यांनी मदत केली आहे.

# १२ तासात वाहन चोरीचा गुन्हा उघड, एकुण ५ गुन्हे उघड
# ३ आरोपी अटक
# २ लाख २५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
# रामटेक पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेक **:— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री राजेशकुमार थोरात, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन रामटेक यांच्या नेतृत्वात रामटेक पोलीसांनी अवघ्या १२ तसात ट्रॅक्टर चोरीच्या गुन्हया सह ०५ गुन्हे उघड करून केले. एकुण २,२५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर प्रकरणी ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

दिनांक २६/०८/२०२६ रोजी रामटेक पोलीस स्टेशन येथे ट्रॅक्टर चोरीचा गुन्हा नोंद असुन रामटेक पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथक सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध घेत असतांना त्यांना दिनांक २७/०८/२०२६ रोजी रात्रगस्तीदरम्यान संशयित ट्रॅक्टर—मुंडा फिरताना आढळून आला. नमुद इसमास विश्वासात घेऊन त्याच्या कडे कौशल्यपुर्व चौकशी केली असता ट्रॅक्टर—मुंडा चालक नामे **आरोपी क्र. १) आर्यन रमेश पासवान, वय २४ वर्षे, रा. प्रेमनगर, कन्हान माईन, ता. रामटेक याने त्याच्या साथीदारांसह रामटेक पोलीस ठाणे हद्दीत ट्रॉली व ट्रॅक्टरची चोरीचे ०५ गुन्हे केल्याची माहीती दिली. त्यावरून आरोपी क्र १) चे साथीदार २) नितीशसिंग व्यासमुनी सिंग, वय २० वर्ष, रा. जैन हॉस्पिटल जवळ, कांद्री कन्हान ता. पारशिवनी आणि ३) रोशन धोरणलाल भवतेकर, वय २६ वर्ष , रा. चौघान, रामपुरी, ता. रामटेक** यांचा तात्काळ शोध घेवुन त्यांना सुध्दा अटक करण्यात आली आहे. **जलद गतीने तपास करून अवघ्या १२ तासात गुन्हा उघड करून इतर गुन्हयांचा सुध्दा उलगडा करण्यात आला आहे.**

**नमुद आरोपीच्या ताब्यातुन ०१ ट्रॅक्टर ट्रॉली, ०१ दातार, ०१ रोटावेटर इतर साहीत्य तसेच चार गुन्ह्यातील वस्तु विक्री करून मिळवलेली ९२,०००/— रुपये रोख रक्कम असा एकूण २,२५,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. तिनही आरोपींना अटक करण्यात आली आहे.**




## पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला तात्काळ अटक

**पोलीस स्टेशन काटोल** :— फिर्यादी नामे सौ योगिता गणेश रेवतकर, वय ३० वर्षे, रा रेवतकर ले आउट, काटोल, जि नागपुर यांनी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली की, दिनांक २६/०८/२०२६ चे संध्याकाळी ०५.०० ते ०६/०० वा.वाजेच्या सुमारास फिर्यादीचे पती आरोपी नामे **गणेश विठलराव रेवतकर वय ३६ वर्ष रा रेवतकर ले आउट काटोल जि नागपुर** यांनी रेवतकर ले आउट काटोल जि नागपुर येथे त्यांच्या राहत्या घरी घरगुती कारणावरून भांडण करून फिर्यादील हातोडी ने मारून गंभीर जखमी केले.तसेच फिर्यादी आणि आरोपी यांचा मुलगा वय ७ वर्षे याला सुध्दा मारहाण करून गंभीर जखमी करून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला. सदर प्रकरणी आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन काटोल येथे कलम १०९(१) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी काटोल यांच्या मार्गदर्शनात काटोल पोलीसांनी आरोपी नामे गणेश विठलराव रेवतकर, वय ३६ वर्ष ,रा. रेवतकर ले आउट, काटोल जि नागपुर याला तात्काळ ताब्यात घेवुन अटक केली आहे.**

# नरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत सराईत गुन्हेगाराला नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत सराईत आरोपी **असलम उर्फ आशु अब्दुल शरीफ खान, वय २२ वर्ष, रा. यशोधरा नगर, नागपूर याला** महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

सराईत गुन्हेगार नामे **असलम उर्फ आशु अब्दुल शरीफ खान, वय २२ वर्ष, रा. यशोधरा नगर, नागपूर याने पोलीस स्टेशन नरखेड हद्दीत चोरी, घरफोडी** या सारखे **अनेक गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी कारवाई करून तसेच प्राप्त तक्रीवरून गुन्हे नोंद केले तसेच प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपी अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवितो तसेच त्याच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव नरखेड पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपीला **२ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**असलम उर्फ आशु अब्दुल शरीफ खान**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. १ लाख ६७ हजार ८२० रूपयांचा मुद्देमाल जप्त परशिवणी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक २८/०८/२०२६ रोजी पारशिवणी पोलीसांना गुप्तबामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा सकरला फाटा एच.जी कंपनी जवळील एका टिनचा शेड चा खाली इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. पोलीसांनी तात्काळ कारवाई करत घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे **१) अजय कचरू बागडे वय ३२ वर्ष रा. टेकाडी ता. पारशिवनी, जि. नागपुर,२) उध्दव राजेन्द्र गौरखेडे, वय ३५ वर्ष, रा. कोदाडोंगरी वार्ड, क्र १९,ता.सौसर, जि. पांढुर्णा ह.मु सावनेर सौसंर रोड ता. सावनेर,३) मंगेश प्रकाश चिंचखेडे, वय ३० वर्ष, रा. सातनुर वार्ड क १७**

**ता.सौसर जि. पांढुर्णा, ४) विकास शाली कराम गायधने, वय ३३ वर्ष, रा. खापा नरसाळा वार्ड क ०२ ता. सावनेर जि. नागपुर, ५) प्रभाकर राजेन्द्र गवते, वय २७ वर्ष, रा. सरोदी टोला, सावनेर रोड, पारशिवनी ता. पारशिवनी जि. नागपुर** हे जागीच जुगार खेळतांना मिळुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते, एकुण रोख रक्कम ११,७७०/—रुपये, एक मोटर सायकल, पाच मोबाईल आणि इतर साहीत्य असा एकुण १,६७,८२०/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. नमुद प्रकरणी वरील आरोपी यांच्या विरुद्ध कलम १२ म.जू.का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०५ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २७/०८/२०२६ रोजी अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०५ आरोपीतांवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन पारशिवणी** अंतर्गत आरोपी क्र १) सुरेश संपत भांडे, वय ४० वर्ष, रा. पटगवारी, ता. रामटेक जि. नागपुर, क्र २) प्रशिध्द शिवराज सोमकुवार, वय ४२ वर्ष, रा. मनसर, ता. रामटेक जि. नागपुर, क्र ३) राज राजु शिरके, वय २५ वर्ष रा. मनसर विट भटा ता. रामटेक जि. नागपुर आणि क्र ४) आर्यन हॅरी कॉनर, वय २२ वर्ष, रा. हेटीटोला, मनसर, ता. रामटेक जि. नागपुर हे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **तसेच पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत आरोपी** क्र ५) रितेश शोभेलाल भोयर, वय २१ वर्ष, रा. देशमुख लेआउट वार्ड क्र १०कळमेश्वर हा अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद आरोपीतांवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २१ गुन्हे नोंद

**दिनांक २७/०८/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांकडून अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक तसेच सेवन करणाऱ्यांविरूद्ध विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण २१ गुन्हे दाखल करण्यात आले.**

**पोलीस स्टेशन मौदा** येथे ०५ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा येथे ०१** गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड येथे** ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवपुर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार येथे ०३** गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पारिशवणी येथे** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन** केळवद **येथे** ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन मोहपा येथे** ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन नरखेड येथे** ४ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ६७५० मिली देशी दारू, १०९ लिटर मोहाफुल दारू तसेच वाहन असा एकुण १३,९००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने